# १३ वर्षांचा लेखाजोखा

**'पतसंस्था परिवार'** ह्या आपल्या मासिकास १३ नोव्हेंबर २०१३ रोजी १३ वर्षे पुर्ण होत आहेत. गेल्या १३ वर्षांत अखंडितपणे प्रत्येक महिन्यास 'पतसंस्था परिवार' हे मासिक नियमितपणे प्रसिध्द झाले. वर्गणीदार व हितचिंतक ह्यांना उपलब्धही प्रत्येक महिन्यास करून दिले.



'पतसंस्था परिवार' ह्या मासिकाचा अखंड कार्यकाळ हा जिकरिचा आहे. वर्गणीदार व जाहिरातदार / देणगीदार यांच्या सहकार्याने ह्या मासिकाचे आर्थिक गणित सोडविण्यास बऱ्यापैकी यश प्राप्त झाले. आर्थिक मदतीची खूप अपेक्षा आहे. परंतु हे मासिक चिरंतन आपल्या हाती पडावे व त्याचा फायदा पतसंस्था व इतर सहकारी संस्थांना सुध्दा व्हावा, ह्या हेतूने कितीही आर्थिक अडचणी 'पतसंस्था परिवार' हे मासिक चालविण्यासाठी आल्या तरी भविष्यकाळात सुध्दा त्यात आपण यशस्वी होवू, असे आपण सर्वांनी आत्तापर्यंत केलेल्या सहकार्यामुळे मनोमन वाटते.

१३ वर्षांत सहकारी संस्थांपुढील अनेक आव्हाने व संधी आपल्या ह्या मासिकातून आम्ही मांडलेल्या आहेत. पतसंस्थांनी केलेल्या चांगल्या कामाबद्दल त्यांना गौरविले सुध्दा आहे. **थकबाकीसारखा जटील विषय** व त्यावर शोधायचा मार्ग ह्या विषयावर तर मासिकामध्ये केव्हाच खंड पडला नाही. **www.mahasahakar.com** या वेबसाईटच्या माध्यमातून **बृहन्मुंबई नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशनने** मोठ्या कल्पकतेने व आत्मविश्वासाने कृतीशील उपाय शोधलेला आहे. शेकडो पतसंस्थांनी बृहन्मुंबई नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशनचे सभासदत्व स्विकारले व www.mahasahakar.com चे ही वार्षिक वर्गणीदार झाले. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१, ९१ व निगोशिएबल इन्स्ट्रूमेंट ॲक्ट १८८१ चे कलम १३८ अंतर्गत प्राप्त

झालेले दाखले ह्या वेबसाईटवर अपलोड करण्यासाठी अनेक पतसंस्थांनी प्रत्यक्ष सहभाग घेतल्याबद्दल खूप आशादायक असे वातावरण थकबाकी वसुली संदर्भात झाले. व **हे आपल्या फेडरेशनचे कार्य सर्वांपर्यंत पोहोचविण्याचे काम 'पतसंस्था परिवार'ने अचूकपणे केले ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे.**

बृहन्मुंबई नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशनने सन २०१२-१३ या आर्थिक वर्षासाठी गेल्यावर्षाप्रमाणे ह्याही वर्षी **'महासहकार पुरस्कार - २ रे वर्ष'** या स्पर्धेचे आयोजन केलेले आहे. या महासहकार पुरस्कार स्पर्धेमध्ये भाग घेण्यासाठीचा अर्ज फेडरेशनने आपल्या प्रत्येक सभासद पतसंस्थेला पोस्टाद्वारे यापुर्वीच पाठविला आहे. शिवाय फेडरेशनची वेबसाईट www.mahasahakar.com वरही सदरहू विहीत नमुन्यातील अर्ज उपलब्ध आहे. त्याच्यामध्ये प्रामुख्याने (**१**) संस्थेचे नाव (**२**) नोंदणी क्रमांक (**३**) कार्यालयाचा संपुर्ण पत्ता (**४**)संपर्क क्रमांक (**५**) अध्यक्षांचे नाव व मोबाईल (**६**) सचिवांचे नाव व मोबाईल (**७**) ठेवी - सन २०११-१२ व सन २०१२-१३ (**८**) ठेवीमधील वाढ(टक्के) (**९**) कर्ज वाटप - सन २०११-१२ व सन २०१२-१३ (**१०**) कर्जवाटपातील वाढ(टक्के) (**११**) ढोबळ नफा (**१२**) निव्वळ नफा (**१३**) नफ्याचे खेळत्या भांडवलाशी प्रमाण (टक्के) (**१४**) लाभांश (**१५**) गुंतवणूक (**१६**) गुंतवणूकीचे ठेवीशी प्रमाण (टक्के) (**१७**) सी.डी. रेशो (**१८**) एन.पी.ए.

याप्रमाणे मुद्दे समाविष्ट करण्यात आलेले आहेत. **१५ नोव्हेंबर २०१३ पर्यंत** पतसंस्थांनी सदरहू विहीत नमुन्यातील अर्ज भरून सोबत २०१२-१३ चा वार्षिक अहवाल तसेच ताळेबंद व नफा-तोटा पत्रक प्रमाणित करून फेडरेशनच्या कार्यालयात पाठविण्याची व्यवस्था करावी असे यापुर्वी सुध्दा कळविण्यात आले आहे.

महासहकार पुरस्कार या स्पर्धेसाठी फेडरेशनने ४ गटात विभागणी केलेली आहे, ती खालीलप्रमाणेः-

गट क्र. १ (रू.१ कोटी पर्यंत ठेवी) गट क्र. २ (रू.१ कोटी ५ पर्यंत ठेवी)

गट क्र. ३ (रू.५ कोटी २५ पर्यंत ठेवी) गट क्र. ४ (रू.२५ कोटी पुढील ठेवी)

एकंदरीत ज्या पतसंस्था उत्कृष्टपणे व आदर्शवत काम करतात, त्यांचे अनुकरण इतरांनी करावे व विजयी स्पर्धकाला सर्वांनी गौरवून त्यांना आणखी उत्तुंग भरारी मारण्यास प्रवृत्त करावे, ही या पाठीमागची मूळ संकल्पना आहे.

सभासदांकडून स्विकारलेली भागांची व ठेव रक्कम १०० टक्के सुरक्षित ठेवून **संस्था कायम नफ्यात ठेवणे , सभासदांना चांगला लाभांष देणे, ठेवीवर चांगले व्याज देणे व सर्व वैधानिक तरतुदी करून** पतसंस्थेची पुढील वाटचाल करणे यासाठी थकबाकी या जटील समस्येवर मात करणे, हा एकमेव पर्याय आपल्या सर्वांसमोर आहे. आणि याचा पाठपुरावा आपण गेली १३ वर्षे 'पतसंस्था परिवार' या मासिकामधून नियमितपणे करीत आहोत.

असेच प्रेम व सहकार्य भविष्यातही असू द्यावे, धन्यवाद !

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!**